# साल १९४७–४८ सालचें प्रशासक मंडळ
## ( Governing Council )

**अध्यक्ष**—

प्रो. **डी. डी. कपाडिया**, एम. ए., बी. एस्. सी., रिटायर्ड (आ. इ. एस्.)

**उपाध्यक्ष**—

(१) श्री. ज. स. उर्फ **तात्यासाहेब करंदीकर**, बी. ए., एलएल्. बी., माजी संपादक, केसरी. (२) रावबहादूर **एन्. एस्. जोशी**, बी. ई. (सिव्हिल) एम्. आय. इ. (इंग्लंड), एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर निरा कॅनाल्स डिव्हिजन पी. डब्ल्यू. डी.

**नैधिक ( खजिनदार )**—

प्रा. **सखारामपंत आपटे**, एम. ए., बी. एस्. सी., रिटायर्ड (बी. इ. एस्.)

**कार्यवाह**—

(१) श्री. **एस्. एन्. हरीप**, रिटायर्ड हेडक्लार्क, पब्लिक हेल्थ इंजिनियरिंग सर्कल ( ज्योतिर्भूषण ).
(२) प्रो. **जी. सी. परांजपे**, एम्. एस्. सी., इंजिनियरिंग कॉलेज, पुणें.

**अधीक्षक ( हिशेब तपासनीस )**—

श्री. **एल्. के. तांबे**, हेडक्लार्क व अकौंटंट, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें.

**सदःस्थ ( सभासद )**—

(१) प्रो. **एम्. एल्. चंद्रात्रेय**, एम्. ए., कॉलेज ऑफ इंजिनियरिंग.
(२) श्री. **एस्. के. नेऊरगांवकर**, बी. ई. (सिव्हिल) ए. एम्. आय. ई. म्युनिसिपल इंजिनियर, पुणें. (३) प्रो. **एस्. के. देव**, बी. ई. (सिव्हिल) कॉलेज ऑफ इंजिनियरिंग. (४) श्री. **टी. जी. ढवळे**, बी. ए., मीटिऑरॉलॉजिकल असिस्टंट, ऑब्झरव्हेटरी, पुणें. (५) श्री. **बाबासाहेब पटवर्धन**, बी. ए., एलएल. बी., ज्योतिर्गणिताचार्य. (६) पं. **रघुनाथशास्त्री पटवर्धन**, ज्योतिषाचार्य. (७) कुमार श्री. **आनकचंद्र** ऑफ **मायावडार**, काठेवाड स्टेट. (८) श्री. **आर. डी. करमरकर**, बी. ए., एस्. टी. सी. डी., सेवानिवृत्त. (९) श्री. **डी. जी. फडके**, बी. ए., एलएल्. बी., शिक्षक.

“ ज्ञानस्य निर्मलं नेत्रम् ज्योतिष्यक मनुत्तमम् ”

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें

( स्थापना—श्रीगणेशचतुर्थी शके १८६६ ता. २२ ऑगस्ट १९४४ )

☆

# संस्थेचा अल्प परिचय व त्रैवार्षिक वृत्तान्त

( दिनांक ३० जून १९४७ अखेर )

## प्रास्ताविक

ज्योतिर्विद्या परिसंस्थेस तीन वर्षें पुरी होऊन ती आतां चवथ्या वर्षांत पदार्पण करीत आहे; तेव्हां संस्थेच्या कार्याचें गेल्या तीन वर्षांतील निवेदन आज या वृत्तान्त रूपानें सविस्तरपणें आपणांपुढें मांडण्यास आनंद वाटतो. संस्था स्थापन झाल्यापासून आजपावेतों तिची थोडीफार सेवा करण्यास जी संधी आम्हांस प्राप्त झाली तिजबद्दल आम्हीं संस्थेचे ऋणी आहोत. संस्थेची हळूं हळूं पण निश्चयानें प्रगती होत आहे हें निवेदनावरून सर्वांच्या ध्यानीं येईल.

## परिसंस्थेची आवश्यकता व स्थापना

“ दिक् देश आणि काल ” या त्रयीचें यथार्थ ज्ञान प्रत्येक व्यक्तीला असणें अत्यंत आवश्यक आहे. जनतेला या ज्ञानाचा फार उपयोग असून या त्रयीच्या परिचयावर आधारलेले जे जे व्यवहार ते ते यथावत् व शुद्धपणें चालावेत अशी जनतेची साहाजिकच मनापासून इच्छा असते. हें ज्ञान देण्याचें शुद्ध पंचांग

हें एक साधन आहे; पण पंचांग विषयाला आधारभूत जें गणित-ज्योतिष व वास्तव-ज्योतिष त्याचाच नेमका अभाव आपल्यांत पुष्कळच आहे. बरें; या बाबतींत सरकारी चालना असावी तीहि नाहीं. सुमारे १९०७-८ सालापर्यंत शाळांमधून मॅट्रिकचे वर्गापर्यंत या संबधानें कांहीं तुटपुंजे ज्ञान देण्यांत येई. ग्रह, तारे, उल्का, ग्रहणें वगैरे संबंधीं अगदीं प्राथमिक माहिती यांत अंतर्भूत असे. पण शिक्षणाधिकाऱ्यांनीं तो विषयच काढून टाकल्यानें हें हि ज्ञान मिळेनासें झालें व पुण्यांत एक लहानशी वेधशाळा ( ऑब्झरव्हेटरी ) होती तीहि नामशेष झाली. एतावता ज्योतिष्यकाचें ( गणित व वास्तव ज्योतिषाचें ) अध्यापनही नाहीं व वेध-साधनेंही नाहींत अशी या बाबतींत आजवर दैन्यावस्था व हेळसांड झालेली आहे. सांप्रतकाळीं पंचांगविषयक जे अनेक वाद आहेत त्यांच्याही बुडाशीं या ज्योतिर्गणिताच्या व्यापक व यथावत ज्ञानाचा अभाव हेंच प्रमुख कारण आहे.

या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन पुण्यासारख्या महत्त्वाच्या केंद्रस्थानीं ज्योतिष्यकाकरितां एकादी नमुनेदार संस्था स्थापन करावी, तिनें गणित आणि वेध यांची योग्य सांगड घालून शुद्ध आणि विश्वसनीय ज्ञान जनतेपुढें मांडीत रहावें, प्राचीन परंपरेला व आधुनिक कालाला साजेल अशी स्थानिक प्रथा निर्माण करावी इत्यादि तळमळीचे विचार येथील कित्येक विद्वान कार्यकर्त्यांच्या मनांत प्रादुर्भूत होऊन या गोष्टीचा विचार करण्याकरितां प्रिन्सिपॉल केशवराव कानिटकर यांच्या अध्यक्षतेखालीं एक अनौपचारिक सभा घेतली गेली व तिचेंच दृश्यफल म्हणजे शके १८६६ च्या श्रीगणेशचतुर्थीच्या दिवशीं वरीलप्रमाणें निश्चित ध्येय अनुसरणारी ही परिसंस्था ( association ) स्थापन केली गेली.

संस्थेच्या आद्य प्रवर्तकांची यादी परिशिष्ट नं. १ मध्यें सोबत जोडली आहे. ती वरून असें दिसून येईल कीं संस्था स्थापन करणाऱ्या कामीं विद्वान व नामवंत व्यक्तींचें बहुमोल साहाय्य व परिश्रम कारणीभूत आहेत व संस्थेच्या पाठीशीं इतरही विद्वानांचा मोठा आधार आहे. संस्थेला अध्यक्षही प्रो. डी. डी. कपाडिया यांच्यासारखे नामवंत, सुविद्य, ज्योतिर्गणितांत पारंगत आणि उत्साही लाभले आहेत. पूर्वी हे जुन्या डेक्कन कॉलेजमध्यें ज्योतिष व गणित या विषयांचे अध्यापन करीत असत व त्यांच्याजवळ तद्विषयक अनेक ग्रंथ व उपकरणें यांचा उत्तम संग्रह आहे.



## संस्थेची घटना व उद्देश

संस्थेची घटना व संस्थेचे उद्देश, घटना पत्रकांत सविस्तर व संपूर्णपणें दिले आहेत व हें पत्रक कोणासही **विनामूल्य** मिळूं शकते; तत्रापि त्यापैकीं महत्त्वाचा भाग खालीं दिला आहे.

( अ ) **महत्त्वाचे उद्देश**—ज्योतिष्यकाच्या शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार होण्याकरितां आकाश निदर्शनें व विद्वानांची जिज्ञासूंना यथार्थ ज्ञान देणारी व्याख्यानें करविणें. २. ज्योतिष्यकांतील वेध, आकाश-निरीक्षण, गति-मापन यांना लागणारी साधन सामग्री मिळविणें. ३ अभ्यास-मंडळे चालवून प्राचीन व अर्वाचीन ज्योतिष ग्रंथाचें अध्ययन वाढविणें. ४ एतद्विषयक ग्रंथ संग्रह करणें, निबंध पुस्तकें, चित्रपट, पत्रकें इत्यादिकांचें प्रकाशन करणें. व ५ पुण्यामध्यें किंवा आसपास योग्य स्थळ पाहून ज्योतिष्यक वेधशाळा स्थापन करणें.

( आ ) **सभासदत्वाचे वर्ग व वर्गणीचे दर**—

प्रथम ( वदान्य ) वर्ग – वर्गणी रु. ५०० किंवा अधिक एका वर्षांत देणारे

द्वितीय ( दाश्वत् ) वर्ग – ,, ,, १०० ,, ,, ,, ,,

तृतीय ( ददान ) वर्ग – ,, ,, ३ प्रतिवर्षी देणारे

चतुर्थ ( सहाय्यक ) वर्ग – ,, ,, १ ,, ,, ( या वर्गाला अधिकारी-मंडळांत निवडून जातां येत नाहीं. )

कोणाही स्त्री पुरुषास संमती पत्रकावर मान्यतेची सही करून व आवश्यक वर्गणी देऊन परिसंस्थेचे सभासद होता येते.

( इ ) **निकाय ( सर्वसाधारण ) सभा**—परिसंस्थेच्या निकाय सभा साधारणपणें वर्षातून दोन वेळां भरतात व संस्थेचें वर्ष जुलै ते जून अखरपर्यंत धरलें जातें.

( ई ) **प्रशासक-मंडळ**— ( Governing Council ) परिसंस्थेचें व्यवस्थापन मुख्यत्वें तिच्या प्रशासक मंडळाकडे सोंपविलेलें आहे. हें मंडळ संस्थेच्या निकाय सभेनें आपल्यांतून दरवर्षी निवडून द्यावयाचें असतें. या मंडळांत एक अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष, एक निधि-धारक, दोन कार्यवाह व नऊ प्रशासक असे एकंदर पंधरा सभासद निवडून आलेले असतात. या प्रशासक मंडळानें सर्व महत्वाचा कारभार पहावयाचा असतो. व्याख्यानें करविणें, निदर्शनें करणें, अभ्यास मंडळे चालविणें, प्रकाशन करणें, जमाखर्चाची व्यवस्था, वर्गण्या व देणग्या मिळविणें इत्यादि महत्वाच्या बाबींवर प्रशासक मंडळाची देखरेख असते. संस्थेचा जमाखर्च व हिशेब तपासण्याचें काम अधीक्षक यांचेकडे असून त्यांची निवडही निकाय सभेंत होते.

( उ ) **तद्विद्य-मंडळ**—प्रशासक मंडळानें आपल्यामधून निवडलेल्या ५–६ सभासदांचें हें एक छोटें मंडळ असतें. यांनीं फक्त शास्त्रीय चर्चा, शास्त्रीय कार्यक्रम किंवा शास्त्रीय प्रकाशन यांवर देखरेख व दिग्दर्शन करून तत्संबंधीं कार्य व्यवस्थेस सुव्यवस्थित स्वरूप द्यावयाचें असतें.

( ऊ ) **वर्गणीदार**—संस्थेच्या पटावर आजपर्यंत १०५ सदःस्थ नोंदविले गेले आहेत. त्यापैकीं प्रत्येकीं १०० रु. दिलेले ( शाश्वत् वर्गाचे ) आजीव सभासद एकंदर ९ असून बाकीचे सर्व वार्षिक वर्गणी देणारे ( ददान वर्गाचे ) सभासद आहेत. सर्व सदःस्थांची नांवें व तपशीलवार यादी परिशिष्ट २ मध्यें जोडली आहे.

( ए ) **संस्थेचा हिशेब**—संस्थेचा गेल्या ३ वर्षांचा खातेवार जमाखर्च परिशिष्ट ३ मध्यें तपशीलवार दिला आहे त्यावरून असें दिसून येईल कीं, संस्थेनें आजवर एकंदर रु. १४८६-८-० वर्गणी रूपानें जमविले व खर्च एकंदर आजवर रु. ४०५-१०-९ झाला असून गेल्या साल अखेर शिल्लक रु. १०८०-१३-३ आहे. संस्थेचे हिशेब दर सालअखेर अधीक्षक ( हिशेब तपासणीस ) यांचे कडून पावत्या, बिलें, कीर्द, खतावणी यांचा मेळ घालून काळजीपूर्वक तपासले जातात; तसे ते प्रत्येकवर्षी तपासले गेले आहेत व ते बरोबर आणि निर्दोष असल्याबद्दलचा अधीक्षकांचा शेरा नमूद केला गेला आहे. साधारणपणें रु. ५० पर्यंत शिल्लक कार्यवाह यांचेकडे असून बाकीची वट रक्कम कॉसमॉस-को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेंत ठेविली आहे.



# संस्थेच्या पहिल्या वर्षाचें कार्य

पहिल्या वर्षी संस्थेपुढें अत्यंत महत्वाची अशीं दोन कामें होतीं व त्या कामांतच संस्थेचा बहुतेक वेळ खर्ची पडला पहिलें काम निदर्शनें व व्याख्यानें करण्याकरितां लोकांना जाण्यायेण्यास सोयिस्कर व मध्यवस्तींत जागा पहाणें व दुसरें काम संस्थेची घटना बनविणें. जागेकरतां मंडळानें मध्यवस्तींतल्या ४-५ जागा तपासल्या. जागा पहावयाची म्हणजे तींत अनेक गोष्टींचा विचार होता. व्याख्यानाकरतां सभा मंदिर पाहिजे, जेथून आकाश आणि क्षितिज भरपूर दिसेल अशी गच्ची पाहिजे, वेळीं अवेळीं दिवसा-रात्री केव्हांहि तेथें जाऊन आकाश निदर्शनें करतां येतील अशी सोय पाहिजे, संस्थेचे दुर्बिण यंत्रें वगैरे किरकोळ सामान ठेवण्याची व्यवस्था पाहिजे, आबालवृद्धांना रात्रीं किंवा पहाटे सहज जाता येतां येईल, अशी मध्यवस्तींत जागा पाहिजे. अनेक जागा पाहिल्यानंतर संस्थेच्या सुदैवानें नानावाड्यांत अशी जागा व प्रशस्त व सोयीस्कर गच्ची उपलब्ध झाली. संस्थेनें लगेच डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडे प्रयत्न करून कांहीं अटीवर वापरण्याकरितां वरील जागा मिळविली. परिसंस्था या मदतीबद्दल डेक्कन एज्युकेशन सोसायटीची सदैव ऋणी राहील.

घटना बनविण्याचें काम मुख्यतः प्रा. सखारामपंत आपटे, श्री. त्र्यंबकराव ढवळे व प्रा. श्री. कृ. देव यांनीं केलें. निरनिराळ्या संस्थांच्या घटना तपासून त्यांतील परिसंस्थेला उपयुक्त असा भाग काढून परिश्रमपूर्वक घटना बनविली व प्रशासक मंडळानें तिला मान्यता दिली. या नंतरचें काम संस्था नोंदवून घेण्याचें होतें. हें काम मुंबईस व्हायचें असतें. परिसंस्थेचे प्रशासक मंडळाचे उत्साही सभासद प्रो. मो. ल. चंद्रात्रेय हे त्यावेळीं मुंबईस होते. त्यांनीं नोंदणी कचेरींत अनेक वेळां जाऊन योग्य ती माहिती पुरवून संस्था लगेच त्याच महिन्यांत म्हणजे जुलै १९४५ मध्यें नोंदवून घेतली. संस्था नोंदविल्यामुळें तिचा पाया भरभक्कम झाला व संस्थेबद्दलची अधिक आस्था व आपुलकी सभासदांमध्यें निर्माण झाली यांत बिलकूल संशय नाहीं.

या वर्षीचें आणखी एक उल्लेखनीय कार्य म्हणजे पं. रघुनाथशास्त्री यांचे ता. ८-३-४५ रोजी "ज्योतिर्विद्या परिसंस्था व तिचें महत्वाचें कार्य" या विषयावर एक व्याख्यान झालें. त्यांनीं त्यावेळीं अनेक उपयुक्त सूचना परिसंस्थें-पुढें मांडल्या. याच वर्षी नानावाड्याच्या गच्चीवरून प्रा. सखारामपंत आपटे यांनीं ता. २६ मार्च, ६ एप्रिल, १३ एप्रिल, ४ मे व ११ मे १९४५ रोजीं रात्रीं आकाश निदर्शनें करून ठळक ठळक ताऱ्यांचा परिचय करून दिला.

## संस्थेच्या दुसऱ्या वर्षाचें कार्य

संस्था नोंदविली गेल्याबरोबर जनतेचें लक्ष संस्थेकडे अधिक वेधलें हें वर नमूद केलेंच आहे. संस्थेच्या पटावर "दाश्रय" वर्गाचे सदस्य प्रत्येकीं १०० रु. भरून येऊं लागले व एकंदर सर्व साधारण वर्गणी-दारांचा आकडा यावर्षी ८० पर्यंत चढला.

या सालीं तद्विद्य-मंडळानें एक नवा उपक्रम सुरू केला. याज्ञवल्क्य आश्रमांत प्रो. मो. ल. चंद्रात्रेय, प्रो. गं. चिं. परांजपे, प्रो. श्री. कृ. देव व दिल्लीहून आलेले एक सद्गृहस्थ पं. इंद्रदेव या सर्वांनीं सूर्य सिद्धांताच्या ५ अध्यायांचें नियमित वाचन केलें. शिवाय यावर्षी प्रो. चंद्रात्रेय नानावाड्यांत दर रविवारी दुपारीं अभ्यास-मंडळाचा तास घेत असत व त्यांनीं पुनः सूर्य सिद्धांताचे ४-५ अधिकार श्रोत्यांना समजाऊन दिले, बऱ्याच लोकांनीं याचा फायदा घेतला.

### दूरादर्श :

निदर्शनाच्या वेळीं दूरादर्शाची ( दुर्बिणीची ) उणीव तीव्रतेनें भासूं लागली म्हणून एकादा दूरादर्श मिळवावा अशा बद्दल बरीच खटपट करण्यांत आली. लेडी ठाकरसी यांचेकडे एक बराच मोठा दूरादर्श असून तो संस्थेला मिळण्याचा संभव आहे असें कळल्यावरून त्या बाबतींत खटपट करण्यांत आली पण अद्याप यश आलें नाहीं. तदनंतर प्रो. मो. ल. चंद्रात्रेय यांनीं प्रोफेसर एस. जी. साठे रिटायर्ड (I. E. S.) यांचे कडून वापरण्याकरतां एक ३॥ इंची दूरादर्श मिळविला व त्याचाच सध्या आकाश निदर्शनाकरता हल्लीं उपयोग होत आहे. नूतन मराठी विद्यालयाच्या अधिकाऱ्यांनीहि शाळेचा दूरादर्श अनेकवेळां वापरण्याकरतां दिला व त्याचें उत्साही शिक्षक द. वि. नवाथे यांनीं निदर्शनाचें वेळीं अनेक वेळां आपुलकीनें साहाय्य केलें हें नमूद करण्यास आनंद वाटतो. संस्था याबद्दल त्यांची ऋणि आहे.

### व्याख्यानें व निदर्शनें :

ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन या शिक्षण संस्थेच्या सुपरिंटेंडेंट कडून त्यांच्या विद्यार्थ्यांकरतां २-३ व्याख्यानें संस्थेकडून व्हावीत अशी इच्छा प्रदर्शित केली गेली. त्यांच्या निमंत्रणांप्रमाणें प्रा. सखारामपंत आपटे यांनीं मुलापुढें "आधुनिक पंचांग" या विषयावर तां. १-७-४५ व २४-७-४५ रोजीं दोन व्याख्यानें दिलीं.



याच सालीं आणखी एक महत्वाचें व्याख्यान काठेवाडचे एक सरदार व परिसंस्थेचे एक आजीव सभासद कुमार श्री. आनकचंद्र यांचें "वेदांतील कांहीं गोष्टींचा ज्योतिष्यदृष्टया विचार" या विषयावर फर्ग्युसन कॉलेजमध्यें उपरिदर्शाचे ( एपिस्कोपच्या ) साहाय्यानें ता. २४-२-४६ रोजी व्याख्यान झालें. प्रो. कपाडिया, श्री. तात्यासाहेब केळकर, कॉलेजची बरीच प्रोफेसर मंडळी या व्याख्यानाला हजर होती व व्याख्यान सर्वांना आवडलें. ह्या व्याख्यानाचा अनुवाद 'सह्याद्रि' मासिकाच्या एप्रिल १९४६ च्या अंकांत खुद्द तात्यासाहेब केळकर यांनीं केला आहे तो वाचकांनीं पहावा.

ग्रह वक्री कसे होतात या विषयासंबंधानें श्री. त्र्यंबकराव ढवळे यांनीही एक विवेचनात्मक लेख सह्याद्रीच्या याच अंकांत संस्थेतर्फे दिला आहे.

प्रा. सखारामपंत आपटे यांनीं संस्थेकरतां एक तारा-पट तयार केला. परिध्रुव प्रदेश अर्थात उत्तरध्रुवासमोर असणारे ठळक ठळक तारे यांत दाखविलेले असून या पटावरून कोणत्याही दिवशीं किती वेळ झाला आहे हें आकाश निदर्शनावरून कळूं शकतें हें यांतील वैशिष्ट्य आहे. या चित्रपटाची किंमत अवघी ४ आणे ठेविली आहे व तो कोणासही विकत घेतां येतो.

ता. २ जून १९४६ रोजीं पहाटें ५॥ वाजतां नूतन मराठी विद्यालयामध्यें दोन दूरादर्शाच्या साहाय्यानें प्रा. आपटे, श्री. नवाथे व श्री. हरीप यांनीं शुक्राची कोर दाखविण्याचा कार्यक्रम केला; दीड दोनशें लोकांनीं त्या निदर्शनाचा लाभ घेतला.

## संस्थेच्या तिसऱ्या वर्षाचें कार्य

संस्थेला एक प्रकारचें स्थैर्य प्राप्त झालें व जनतेपुढें कांहींना कांहींतरी हळूं हळूं पण नेटानें एकसारखा उपयुक्त कार्यक्रम गेल्यावर्षी ठेवला गेला. आक्टोबरच्या १९४६ च्या सह्याद्रीच्या अंकांत कार्यवाह श्री. शं. ना. हरीप यांनीं संस्थेच्या माहितीचा एक विस्तृत लेख लिहिला.

प्रशासक मंडळानें या सालीं विद्वानांच्या व्याख्यानांचा व आकाश-निदर्शनाचा भरगच्च कार्यक्रम ठेवला. त्याची तपशीलवार माहिती पुढें दिलीच आहे. शिवाय प्रो. चंद्रात्रेय व प्रो. गुर्जर यांनीं सतत २ महिने नानावाड्यांत आळीपाळीनें दर रविवारी दुपारीं तास दीड तास अभ्यास-मंडळ चालविलें व त्याचा फायदा अभ्यासू जिज्ञासूंना चांगलाच झाला.

## पहिल्या सहामाहींतील व्याख्यानें एकंदर १४

| तारीख | व्याख्याते | स्थळ | विषय |
|---|---|---|---|
| ५। ७।४६ | प्रा. सखारामपंत आपटे | विश्राम | आधुनिक पंचांग |
| १९। ७।४६ | ,, | मंडळ | ,, |
| २। ८।४६ | श्री. पी. जे. चिन्मुळगुंद I. C. S. कलेक्टर | नानावाडा | स्वतःची दुर्बीण कशी करावी. |
| ९। ८।४६ | श्री. ज. स. करंदीकर | ,, | सूर्यावरील डाग व त्यांचा पृथ्वीवर परिणाम. |
| १६। ८।४६ | प्रो. डी. डी. कपाडिया | ,, | Storiographic Projection and how it is utilized in Astronomical charts. |
| २३। ८।४६ | प्रा. सखारामपंत आपटे | ,, | परिध्रुव प्रदेश. |
| ३०। ८।४६ | प्रा. श्री. कृ. देव | ,, | वर्णपट्टाचा ज्योतिष्यकांत उपयोग. |
| १३। ९।४६ | श्री. त्र्यं. गो. ढवळे | ,, | कालमापन व त्याचीं साधनें |
| २०। ९।४६ | प्रा. गं. चिं. परांजपे | ,, | विश्वकल्पना |
| २७। ९।४६ | कुमार श्री. आनकचंद्र | ,, | Whether Capila or Vega be identified with Brahma-Hridaya. |
| ११।१०।४६ | ज्यो. पं. रघुनाथशास्त्री | ,, | पंचांग सुधारणा. |
| १३।१०।४६ | प्रो. मो. ल. चंद्रात्रेय | ,, | सूर्य सिद्धांत. |
| १८।१०।४६ | प्रा. सखारामपंत आपटे | ,, | नोव्हेंबरमहिन्यांतील आकाश |
| १।१२।४६ | प्रा. मो. ल. चंद्रात्रेय | ,, | सूर्य सिद्धांत. |



## आकाश निदर्शनें एकंदर १३

| तारीख | दर्शक | स्थळ | दृश्य |
|---|---|---|---|
| १८।१२।४६ | प्रा. सखारामपंत आपटे | नू. म. वि. | गुरु व शुक्र |
| २०।१२।४६ | व. द. वि. नवाथे | सकाळीं ५॥ | |
| २८।१२।४६ | प्रा. सखारामपंत आपटे | रमणबागगच्ची | आकाश व क्षितीज |
| ३। १।४७ | श्री. श्री. वि. नाईक | सायंकाळ | |
| ६। १।४७ | प्रा. गं. चिं. परांजपे | ,, | ,, |
| ७। १।४७ | श्री. शं. ना. हरीप | ,, | ,, |
| १८। १।४७ | प्रा. सखारामपंत आपटे | रमणबागगच्ची | सूर्यावरील डाग व |
| २०। १।४७ | प्रा. गं. चिं. परांजपे | सायंकाळ | शनीचीं वलयें |
| २३। १।४७ | ,, | ,, | ,, |
| २५। १।४७ | ,, | ,, | ,, |
| २८। १।४७ | ,, | ,, | ,, |
| २९। ४।४७ | प्रा. सखारामपंत आपटे | नगरवाचन | सूर्यावरील डाग |
| ३०। ४।४७ | | मंदीर—सायंकाळ. | ,, |

( वरील सर्व निदर्शनें दुर्बिणीच्या साहाय्यानें केलीं गेलीं )

---

### पुढील कार्यें

तातडीनें हातीं घ्यावयाची अशीं ५ कार्यें परिसंस्थेनें निवडून काढली आहेत. व त्याचा उपक्रम परिस्थित्यनुरूप करण्यांत येणार आहे. ती म्हणजे (१) शाळाकॉलेजांतील प्रौढ मुलांकरतां बोध व्याख्यानें शाळांतूनच करणें. (२) ज्योतिषविषयक साधनें जमविणें. (३) ताराचित्रक व कांहीं शास्त्रीय वाङ्मय छापून काढणें. (४) झालेल्या व्याख्यानांतील महत्वाचा सारांश छापून काढणे. (५) अभ्यास-मंडळाला सुरवात करून शास्त्रीय ग्रंथ समजाऊन सांगणें.

या बरोबरच मधून मधून विद्वानांची व्याख्यानें व योग्य दिवशीं आकाश निदर्शनेंही केली जातीलच.

वर उल्लेखिलेल्या बहुतेक व्याख्यानांचें सारांश लिहून तयार आहेत; ते प्रकाशित केल्यास अर्थात उपयुक्त वाङ्मयांत शास्त्रीय भर चांगली पडण्यासारखी आहे. परिस्थिती अनुकूल झाल्याबरोबर हें काम हातीं घेतले जाईल.

## अपेक्षा

संस्थेचा व्याप व तिनें आरंभिलेलें कार्य विचारांत घेतां, संस्थेला दोन गोष्टींची अत्यंत आवश्यकता आहे. एक द्रव्य बळ व दुसरें माणुस बळ. दुर्बिणी, यंत्रे, साधनसंभार इत्यादिकांना फार जबर किंमत पडते. पण हळू हळू या वस्तू प्राप्त करून घेतल्याशिवाय सोय नाहीं. ग्रंथ प्रकाशनास किंवा चित्रपट तयार करण्यास किंवा व्याख्यानें छापण्यास द्रव्यनिधीची जरूरी आहे. तेव्हां धनिकांनीं देणग्या देऊन व इतरांनीं वर्गणीरूपानें मदत करावी ही पहिली विनंती. संस्थेकरतां व्याख्यानें देणें, आकाशनिदर्शनाचें वेळीं मदत करणें वगैरे गोष्टीं करतां सुविद्य, तज्ञ, उत्तम वक्ते यांची आतां वाढती जरूरी आहे, तेव्हां जनतेनें परिसंस्थेचे वर्गणीदार होऊन हीहि मदत करण्यास पुढें यावें ही दुसरी विनंती.

---

### परिशिष्ट नं १

### संस्थेचे आद्य प्रवर्तक—

श्री. न. चिं. केळकर, साहित्य-सम्राट.
श्री. ज. स. करंदीकर, माजी संपादक केसरी.
श्री. महामहोपाध्याय द. वा. पोतदार.
श्री. ज. र. घारपुरे, प्रिन्सिपल लॉ कॉलेज.
श्री. सखारामपंत आपटे, माजी प्राध्यापक, एंजीनियरिंग कॉलेज.
पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन, ज्योतिषाचार्य.
श्री. धुं. गो. काळे, बॅरिस्टर व लेबर कमिशनर.



श्री. त्र्यं. गो. ढवळे, मीटिऑरॉजिकल ऑब्झरव्हेटरी असिस्टंट.
श्री. दा. गो. ढवळे, प्रोफेसर, फर्ग्युसन कॉलेज.
श्री. ग. ल. चंद्रात्रेय, प्रोफेसर, फर्ग्युसन कॉलेज.
श्री. नी. वा. किंकर, सुपरिंटेंडेन्ट, म. ए. सो. हायस्कूल.
श्री. शं. ना. हरीप, रिटा. हेडक्लार्क, पब्लिक हेल्थ इंजिनियरिंग.
श्री. भा. ग. वाळिंबे, डेप्युटि इंजिनियर, पब्लिकहेल्थ सर्कल.
प्रो. डी. डी. कापडिया, Retd. I. E. S.
श्री. के. रा. कानिटकर, माजी प्रिन्सिपल, फर्ग्युसन कॉलेज.
श्री. ग. स. महाजनी, प्रिन्सिपल, फर्ग्युसन कॉलेज.
श्री. मो. ल. चंद्रात्रेय, प्रोफेसर, कॉलेज ऑफ इंजिनियरिंग.
श्री. ल. वा. गुर्जर, माजी प्रोफेसर, वाडिया कॉलेज.
श्री. रा. वि. उर्फ बाबासाहेब पटवर्धन, ज्योतिर्गणिताचार्य.
श्री. क. वा. केळकर, प्रोफेसर, फर्ग्युसन कॉलेज.
श्री. रा. पु. शिंदे, प्रोफेसर, फर्ग्युसन कॉलेज.
श्री. व्ही. व्ही. आपटे, प्रोफेसर, फर्ग्युसन कॉलेज.
श्री. त्र्यं. भि. हर्डीकर, माजी प्रोफेसर, सर परशुरामभाऊ कॉलेज.
श्री. वि. श्री. गोरेशास्त्री, व्याकरण कोविद.

---

### परिशिष्ट नं २

## वर्गणीदारांचा तपशिल

**प्रत्येकीं रु. १०० देऊन "शाश्वत्" (दुसऱ्या वर्गाचे आजीव सभासद) झालेले.**

१ प्रो. कपाडिया डी. डी., M. A., Retd. I. E. S. नं. ६ स्टॉटन रोड, पुणें नं. १, १०० रु.
२ प्रा. आपटे सखारामपंत, M. A. B. Sc., Retd, B. E. S. २८१ सदाशिव पेठ, १०० रु.

३ प्रो. चंद्रात्रेय मो. ल., M. A., प्रो. इंजिनियरिंग कॉलेज, पुणें, देशमुख बंगला, घोले रोड, शिवाजीनगर, १०० रु.

४ श्री. बागडे डी. बी., डेप्युटि इंजिनियर पब्लिक हेल्थ सर्कल, पुणें, ४० बुधवार, पुणें २, १०० रु.

५ श्री. कानिटकर केशवराव, M. A., B. Sc. प्रिन्सिपल, अंमळनेर कॉलेज, अमळनेर, जि. खानदेश, १०० रु.

६ बॅरिस्टर काळे डी. जी., Bar-at-Law. असि. लेबर कमिशनर, अमदाबाद, ३७ शनवार, पुणें २, १०० रु.

७ कुमार श्री. आनकचंद्र भयावडारचे सरदार चितळ, काठेवाड स्टेट १०० रु.

८ शेठ अमृतलालभाई दलपतभाई, मॅनेजिंग एडिटर "जन्मभूमी" मुंबई. १३८ मेडोज स्ट्रीट, मुंबई, १०० रु.

९ रावबहादुर एन्. एस्. जोशी, B. E. ( Civil ) एक्झि. इंजिनियर निरा कॅनॉल्स डिव्हि. ११८७ शिवाजीनगर, १०० रु.

---

## तिसऱ्या ( ददान ) वर्गाचे सभासद वार्षिक वर्गणी प्रत्यकीं ३ रु. देणारे.

१ श्री. अळकुटकर गो. मा., B. E. ( Civil ) इंजिनियर व परसनल असि. पब्लिकहेल्थ डिपार्ट. ९६७ सदाशिव, पुणें.

२ श्री. आपटे व्ही. ए., M. A., प्रोफेसर, आपटे बंगला, डेक्कन जिमखाना.

३ श्री. बडवे र. चिं., M. A., मिलिटरी डिपार्ट. सुपरवायझर, १०१४ सदाशिव, पुणें.

४ श्री. बोडस वि. वा., हेडक्लार्क, पब्लिकहेल्थ डिव्हि. ३३८ सदाशिव, पुणें.

५ श्री. बोकील ना. ग., नोकरी, ३३।४१ एरंडवणे, कर्वे रोड.

६ श्री. बेडेकर के. म., B. A. C. E. रिटा. इंजिनियर, १२५९।२ जंगलीमहाराज रोड.

७ श्री. भट श्री. के., सुखवस्तु, ज्योतिर्विद, ३९६ व नारायण, पेठ, पुणें.

८ श्री. भालेकर बा. तु., B. Sc., B. T., ओरिए. लाईफ. इन्शु. कं. ४७२ शुक्रवार, पुणें २.



९ श्री. चिन्मुळगुंद पां. ज., B. A., I. C. S., कलेक्टर, कँप, पुणें.

१० श्री. चौबळ पी. एम्., B. A., फ्रेंच प्रोफेसर, वाडिया कॉलेज, ७ फायनान्स ऑफिस रोड, पुणें.

११ श्री. देव श्री. कृ., B. E. ( Civil ) इंजिनियरिंग कॉलेज, पुणें, ५९४ बुधवार पेठ, पुणें.

१२ श्री. दिवेकर गो. वि., रिटा. गव्हर्मेंट सर्वंट D. A. C. M. A. डॉ. फडके बंगला, टिळक रोड.

१३ श्री. दातार गो. शं. ड्राफ्समन, पब्लिक हेल्थ सर्कल ८२७ सदाशिव, पुणें

१४ श्री. दामले जी. एस्., B. A., LL B. वकील, २०९ शुक्रवार, पुणें.

१५ श्री. देशपांडे गो. पा., पेन्शनर P. W. D. ६५ शनवार, पुणें.

१६ श्री. देशपांडे य. न., वैद्य, आयुर्वेद विशा. ११९ कसबा, पुणें.

१७ श्री. देशपांडे वि. म., नोकरी, पब्लिक हेल्थ, ३७६ कसबा, पुणें.

१८ श्री. ढेकणे क. भा., B.Sc., सुखवस्तु, ३४९ बुधवार पेठ, पुणें.

१९ श्री. ढवळे त्र्यं. गो., B. A., मिटिरिऑलाजिकल असिस्टंट वेधशाळा खाते, १३६२ शिवाजीनगर.

२० श्री. फणसे के. वि. राजीनामा दिला.

२१ श्री. फडके द. गो., B. A. LL. B. शिक्षक, ७९ शुक्रवार, पुणें.

२२ श्री. गोरे वि. धों., व्याकरण कोविद, संस्कृत शिक्षक, ५१ बुधवार, पुणें.

२३ श्री. गुर्जर एल्. व्ही., M. A., प्रोफेसर, शिवाजीनगर, पुणें.

२४ श्री. हरीप शं. ना. रिटा. हेडक्लार्क पब्लि. हेल्थ सर्कल ४१० कसबा पेठ पुणें

२५ श्री. जोगळेकर ज. के., डेप्युटी इंजिनियर पब्लिक हेल्थ सर्कल ४३४ शनवार

२६ श्री. जोशी गो. म., M. A., शिक्षक, सुखवस्तु, १९६।५१ सदाशिव, पुणें.

२७ श्री. जोशी द. के., इन्स्पेक्टर, सिटि म्युनि. १९१ शुक्रवार, पुणें.

२८ श्री. जोशी रा. द., ओव्हरशियर, पब्लिक हेल्थ खातें, हरिहरनिवास, फर्ग्युसन कॉलेज रोड.

२९ श्री. जोशी शं. ना. ओव्हरशियर, पी. डब्ल्यू. डी. २७ बुधवार, पुणें २

३० श्री. करंदीकर ज. स., माजी संपादक "केसरी" केसरी ऑफिस, पुणें.

३१ श्री. करंदीकर वि. ज., B. A., LL. B., वकील, २६० सोमवार, पुणें.

३२ श्री. करमरकर रा. दा., B. A., S. T. C. D., P. T. S., प्रोफे., कराची कॉलेज, ५१ बुधवार पेठ, पुणें.

३३ श्री. कवलगीकर श्री. ना., M. A., प्रोफेसर, फर्ग्युसन कॉलेज, ३७०शनवार
३४ श्री. कडकोळ एस्. बी. फर्स्ट क्लार्क, पब्लिक हेल्थ सर्कल ५८ सोमवार, पुणें
३५ कुलकर्णी सौ. लक्ष्मीबाई, आयुर्वेद विशारद, १०४ रविवार, पुणें.
३६ श्री. कुलकर्णी आर. जी. नोकरी पब्लिक हेल्थ ५०१ नारायण पुणें.
३७ श्री. कुलकर्णी द. वा., टायपिस्ट पब्लिक हेल्थ सर्कल २०७ सदाशिव, पुणें.
३८ श्री. किवळकर शं. के., ओव्हरशियर, १९६।२६ सदाशिव, पुणें २.
३९ श्री. किंकर नी. वा., M. A., प्रमुख्याध्यापक, म. एज्यु. सोसायटी
४० श्री. कूपर एस्. बी., नोकरी पब्लिकहेल्थ सर्कल, ११५ मेनस्ट्रीट, पुणें.
४१ श्री. कान्हेरे गो. वि., अकौंटंट, इन्शु. कंपनी, ४६५ शनवार, पुणें.
४२ श्री. काटदरे ग. रा., ओव्हरसियर, P. W. D. ४५ वैदिकाश्रम, पुणें.
९३ कानेटकर त्र्यं. पु., B. A., B. E., A. M. I. E. इंजिनि. कॉलेज,
३२४/३ A सदाशिव, पुणें.
४४ श्री. केळकर न. चिं., साहित्य-सम्राट, पुष्करणी बंगला, प्रभात रोड. पुणें.
४५ श्री. केळकर का. न., वकील, सुखवस्तु, पुष्करणी बंगला, प्रभात रोड पुणें.
४६ श्री. केळकर के. व्ही., M. A. प्रोफे., फर्ग्यु. कॉलेज, पुणें.
४७ श्री. खराडे बी. एस्., रिटा. इंजिनियर, P.W.D. ३/३, सदाशिव, पुणें.
४८ श्री. खोले य. द. रावसाहेब, प्रेसिडेंट, सें. को. संस्था, ४४९ बुधवार, पुणें.
४९ श्री. खानोलकर र. शि., D. C. E. ओव्हरसियर, पब्लिकहेल्थ, ६३१।७३
टिळक रोड, पुणें.
५० श्री. खुर्दे मा. द., B. E. (Civil) इंजिनियर, पब्लिक हेल्थ सर्कल,
७७८ शुक्रवार, पुणें.
५१ श्री. लिमये मो. भि., फोटोग्राफर व ज्योतिषी, ६२८ शनवार, आप्पाबळवंत
चौक पुणें.
५२ श्री. लोणकर आर. एम्., प्रा. इंजिनियरिंग कॉलेज, पुणें. १२९३
शिवाजीनगर, पुणें.
५३ श्री. महाजन कृ. द., प्रा. इंजिनि. कॉलेज, ४३७ क नारायण पेठ, पुणें.
५४ श्री. मराठे बि. रा., B. E. (Mechnl.) पब्लिक हेल्थ खाते, ३२२।३
सदाशिव पेठ, पुणें.
५५ श्री. मराठे सौ. कलावती, नोकरी, ३४।२ एरंडवणें, पुणें.



५६ श्री. महाजनी जी. एस्., M. A. (Phd.) रँगलर, फर्ग्युसन कॉलेज, पुणें.
५७ श्री. मंगरूळकर अ. गं., M. A., प्रोफेसर, स. प. कॉलेज, पेंढारकर
बंगला, टिळकवाडी, पुणें.
५८ श्री. मांडके य. पां., ओव्हरसियर P. W. D. पब्लिक हेल्थ वर्क्स डिव्हि.
५९ श्री. मेहेता के. ए. ,, ,, ,,
६० श्री. मोघे वि. अ. सेकंड क्लार्क, पूना वॉटर वर्क्स, ४३१।४४ शुक्रवार, पुणें.
६१ श्री. नरवणे डी. व्ही. मयत
६२ श्री. नागपूरकर पी. बी., B. A. नोकरी, पब्लिक हेल्थ वर्क्स सर्कल,
९०२ शिवाजीनगर, पुणें.
६३ श्री. नातू रा. ना., सुखवस्तु, ६८९ सदाशिव, पुणें.
६४ श्री. नेने वा. वि. पेन्शनर, रंगून ऑब्झरव्हेटरी, ३८।२१ कचरेवाडी, पुणें.
६५ श्री. नेऊरगांवकर एस्. के. B.E., A.M. I. E. म्युनिसि. इंजिनि.
१४१ कसबा, पुणें.
६६ श्री. ओक स. य., स्टोअरकीपर, पब्लिकहेल्थ डिव्हि. ९०४ सदाशिव, पुणें.
६७ श्री. परांजपे ग. रा. राजिनामा दिला.
६८ श्री. पडतुरे रा. ल., स्टोअर्स सुपरिं., पूना वॉटर वर्क्स, ५०६ शनवार, पुणें.
६९ श्री. परांजपे व्ही. एस्., इंजिनियर पब्लिक हेल्थ सर्कल, ३४८ शुक्रवार.
७० श्री. परांजपे गं. चिं., लेक्चरर, कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, ३२५ अ
सदाशिव पेठ, पुणें.
७१ पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन, ज्योतिर्गणिताचार्य, १४० शुक्रवार पुणें.
७२ श्री. पटवर्धन रा. वि., ज्योतिर्गणिताचार्य व सार्वजनिक कार्यकर्ते,
७१५ बुधवार पेठ, पुणें.
७३ श्री. पाटणकर दि. त्र्यं., ड्रेसर, ३४।२ एरंडवणा, पुणें.
७४ पाठक ग. वा., B. A. सिनेमा कॉंट्रॅक्टर, ३१० सोमवार, पुणें.
७५ पासेबंद गो. ना., ओव्हरसियर, P. W. D. १० C गोखले बिल्डिंग,
टिळक रोड, पुणें.
७६ श्री. पिंपळखरे एस्. व्ही., रिटा. ओव्हरसियर, कचरेवाडी, पुणें ४.
७७ पिंपळखरे श्री. कुसुमताई, शिक्षण, फर्ग्युसन कॉलेज, ,,
७८ श्री. पोतदार द. वा., महामहोपाध्याय, ७७ शनवार, पुणें.
७९ श्री. पोमट बी. एल्., सिव्हिल इंजिनियर, P. W. D. २२०, मेनस्ट्रीट पुणें.

८० श्री. प्रभू के. आर., सहसंपादक, बॉंबे क्रॉनिकल, मुंबई क्रॉनिकल ऑफिस.

८१ श्री. रानडे गो. शं., सेवानिवृत्त अकाउंटंट, P. W. D. ४३११।४६ पुरंदरे कॉलनी, पराडकर बंगला.

८२ श्री. रानडे व्ही. व्ही., सुखवस्तु, कौस्तुक बंगला, डेक्कन जिमखाना.

८३ श्री. साठे ना. ग., शिक्षक, आयडियल स्कूल, पुणें, ११३७।१ शिवाजीनगर, पुणें ५.

८४ श्री. साठे आर. टी., सुपरिं. न्यु. इं. स्कू., ७६ शुक्रवार, पुणें.

८५ श्री. साळ्वे ग. गं., नोकरी, पब्लिक हेल्थ सर्कल, ४३२ नारायण, पुणें.

८६ श्री. शारंगपाणी ग. के., बी.ए., एलूएलू.बी., सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसा. ४३११।३९ पुरंदरे कॉलनी, पुणें.

८७ श्री. शेटे वि. त्र्यं., बी.ए., एलूएलू.बी. वकील, १८७ शनवार पेठ, पुणें.

८८ श्री. शिंत्रे रा. पु., M. A., प्रोफेसर, फर्ग्यु. कॉलेज, साठे यांचा बंगला, सदाशिव पेठ, पुणें.

८९ श्री. तांबे. ल. के., हेडक्लार्क, न्यू. इं. स्कूल, ४०४ शनवार, पुणें.

९० श्री. वाणी. के. एन्., M. Sc., प्रा. कॉलेज ऑफ इंजिनि., १२०८।३१ शिवाजीनगर, पुणें.

९१ श्री. वाळिंबे भा. ग., B. E., B. Sc. डेप्युटि इंजिनि. पब्लिक हेल्थ सर्कल ५९४ सदाशिव, पुणें.

९२ श्री. वढवाना एन्. एम्., इंजिनियर P. W. D. पुणें.

९३ श्री. व्यास. एम्. एम्. B. E. (Civil) इंजिनियर P. W. D. शिवाजीनगर.

९४ श्री. वैद्य ब. धों. नोकरी, पब्लिक हेल्थ खाते. ५३६।२ सदाशिव पेठ, पुणें.

९५ श्री. याज्ञिक हरिकृष्ण रेवाशंकर, ज्योतिर्विद १०३४ रविवार पेठ, पुणें २.

९६ श्री. झोपे पं. ल., B. E. मेकॅनिकल ओव्हरसियर, पब्लिक हेल्थ सर्कल ५१५ रविवार पेठ, पुणें.

---

मुद्रक—प्र. भा. काळे, प्रतिभा प्रेस, ३३५ शनवार पुणें २.
प्रकाशक—शं. ना. हरीप व प्रो. ग. चिं. परांजपे, कार्यवाह, ४१० कसबा, पुणें २.

परिशिष्ट नं. ३

## जमाखर्चाचा तपशिल

| जमाबाजू १९४४-४५ | जमाबाजू १९४५-४६ | जमाबाजू १९४६-४७ | खातीं | खर्चबाजू १९४४-४५ | खर्चबाजू १९४५-४६ | खर्चबाजू १९४६-४७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ८८८—०—० | १३९—०—० | ४४०—०—० | वर्गणी | | | |
| २—०—० | | | देणगी | | | |
| | | | टपाल | ६—५—६ | २—१०—० | ९—३—३ |
| | | | स्टेशनरी | २२—४—० | ८—१२—० | ३—०—० |
| | | | छपाई | ७८—१०—० | ८४—०—० | १६—०—० |
| | | | सभा | ५—१२—० | १—०—० | ८—६—० |
| | | | रजिस्ट्रेशन | ५०—०—० | | |
| | | | पदार्थसंग्रह | | | २५—३—० |
| १—०—० | | ६—१२—० | व्याज | | | |
| | | | ग्रंथसंग्रह | | १७—७—० | |
| | | | किरकोळ | ०—१०—० | | २—१२—० |
| | | १०—१२—० | ग्रंथप्रकाशन | | ६०—०—० | १३—१२—० |
| ८९०—०—० | १३९—०—० | ४५७—८—० | | १५४—९—६ | १७३—१३—० | ७७—४—३ |

एकूण जमा... १४८६—८—०
एकूण खर्च... ४०५—१०—९
साल अखेर शिल्लक... १०८०—१३—३